अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# सामाजिक कार्याची सक्ती हा देशभक्तीचा पराभव

काळाचा महिमाच अगाध आहे असे म्हणावे लागेल. आजच्या काळामध्ये घरापासून ते दारापर्यंत म्हणजेच व्यक्तीपासून ते समाजापर्यंत कर्तव्य, जबाबदाऱ्या, संस्कार किंवा सामाजिक मूल्य याबाबत कमालीची अनास्था दिसून येते. सहा महिन्यांपूर्वी महाराष्ट्र सरकारने घरातील आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांना दोषी ठरविणारा कायदा करण्याचे घोषित केले होते. याशिवाय अनेक प्रकारचे नवे नवे कायदे करून महिलांवरचे अत्याचार रोखण्याची वेळ सरकारवर येत आहे. अगदी शिक्षण क्षेत्रातही चालणारे गैरकारभार कायदे करून थांबवण्याची वेळ येते, यावरून एकूणच समाजाची किती वेगाने घसरण होत आहे हे दिसून येते. आता केंद्र सरकारने देशातील मोठ्या कंपन्यांना आपल्या नफ्यातील २ टक्के रक्कम सामाजिक कामासाठी खर्च करण्याची कायदेशीर सक्ती केली आहे. तशा प्रकारच्या कायद्याला नुकतीच मंजुरी दिली गेली. म्हणजेच आई-वडिलांचा सांभाळ करण्यासाठी कायदा, कंपन्यांनी सामाजिक कार्य करावे त्यासाठीसुध्दा कायदा, महिला-बालके यांच्यावरचे अत्याचार रोखण्यासाठी अधिकाधिक कडक कायदा अशा सगळ्या या कायद्याची सक्ती करण्याची वेळ सरकारवर यावी हे आपल्या देशाचे मोठे सामाजिक दुर्दैवच ठरते. खरे तर कायद्याबरोबरच कर्तव्याचे पालन करण्याचे भान समाजाने आणि सरकारनेही ठेवायला हवे. सगळ्याच गोष्टी कायद्याने शक्य होतील असे नाही. उलट समाज चांगल्या स्थितीत ठेवायचा असेल तर प्रत्येकाने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे. आपली सामाजिक जबाबदारी काय आहे याचे भान ठेवले पाहिजे. आजच्या युगामध्ये तू आई-वडिलांचा सांभाळ कर, हे जर मुलाला कायदा करून सांगावे लागत असेल किंवा कंपन्यांनी आपल्या नफ्यातील थोडा भाग समाजासाठी खर्च करावा हेही त्यांना कायदेशीर सक्तीनेच समजावून द्यावे लागत असेल, तर देशाची आणि समाजाची वाटचाल सामाजिक शोकांतिकेकडे सुरू आहे असे म्हणावे लागेल.

## नैतिकतेचे काय

कुटुंबाची रचना ही खरे तर संस्कारांवरच अवलंबून असते. घरातल्या ज्येष्ठांचा आदर, त्यांची सेवा ही परंपरेने चालत आलेली बाब असते. त्यासाठी यापूर्वी कधीही कायद्याची गरज पडली नाही आणि पडूही नये तीच गोष्ट सामाजिक कार्याची आहे. भारतासारख्या फार मोठी प्राचीन परंपरा असलेल्या देशात आपल्या कमाईतला ५ ते १० टक्के भाग समाजासाठी किंवा दानधर्म करण्यासाठी नेहमीच वापरला जातो. गरिबातली गरीब व्यक्तीसुध्दा त्याला मिळालेल्या रोजच्या १० रुपयातले १० पैसे तो भीक मागणाऱ्याच्या कटोऱ्यात सहजपणे टाकतो आणि एक मानसिक समाधान मिळवितो. तू दान कर, यासाठी कोणताही कायदा करण्याची कधीच आवश्यकता भासली नाही. जी गोष्ट सामान्य माणसाला सहज समजते ती गोष्ट मोठमोठ्या कंपन्यांच्या किंवा भांडवलदारांच्या लक्षात येत नसेल असे कसे समजावे. त्यांना त्यांच्या नफ्यातील २ टक्के रक्कम सामाजिक कार्यासाठी खर्च करण्याची कायदेशीर अट घालण्यामागे त्यांची प्रचंड नफेखोरी कारणीभूत ठरते. प्रचंड नफा कमवणाऱ्या या कंपन्यांना किंवा त्याच्या मालकांना त्याची सामाजिक जबाबदारी म्हणजेच सोशल रिस्पॉन्सिबिलिटी काय आहे हे कायद्याने लक्षात आणून द्यावे लागते, यावरून ती मंडळी किती प्रचंड नफा ओरबाडत असतील हेदेखील सिध्द होते. सामाजिक कार्य हा प्रत्येक व्यक्तीच्या नैतिकतेचा अविभाज्य भाग असतो. ती नैतिकता हद्दपार होत आहे, हेच सरकारच्या या कायदेशीर सक्तीवरून लक्षात येते. आता सरकारने कायदाच केला असल्यामुळे तो पाळण्याचे बंधन या कंपन्यांवर राहील. दरवर्षी न चुकता या कंपन्या आपापल्या परिसरात काही सामाजिक कामे करतील. त्याबाबत काही शंका नाही. याचा अर्थ ते आपल्या नफ्यामध्ये २ टक्क्यांची घट करतील असे अजिबात समजण्याचे कारण नाही. उलट आता त्याच्या वार्षिक अंदाज पत्रकामध्ये ते हे दोन टक्के कसे वसूल करायचे याची तरतूद करतील म्हणजेच त्याचे जे काही उत्पादन असेल त्याच्या किमतीतही दोन टक्क्यांनी ते वाढ करतील. सामाजिक जबाबदारीच्या नावाखाली केला जाणारा हा निव्वळ देखावाच ठरणार आहे. २ टक्के नफ्यातून त्या-त्या परिसरातील काही विकासकामे जरूर होतील. परंतु या कंपन्यांच्या नफेखोरीत काही बदल होणार नाही. खरे सांगायचे तर कोणतेही सामाजिक काम असे टक्केवारीवर मोजता येत नाही किंवा आखताही येत नाही.

## कंपन्यांनी जबाबदारी ओळखावी

सामाजिक काम हे उत्स्फूर्तपणे करण्याचा विषय आहे. भारतासारख्या विविधततेने नटलेल्या देशात समस्यादेखील भरपूर आहेत. जेवढे सामाजिक काम कराल तेवढे आज कमीच आहे. अशावेळी मोठमोठ्या कंपन्यांनी स्वत: पुढाकार घेऊन देशाच्या ग्रामीण किंवा आदिवासी भागातील एक-एक खेडे, तिथल्या शाळा, आरोग्य केंद्रे, पाणीपुरवठा योजना दत्तक म्हणून घ्यायला काहीच हरकत नाही. मग त्यासाठी वेळ पडली तर त्याच्या नफ्यातील ५-१० टक्के रक्कम जरी खर्च करावी लागली तरी ती केली पाहिजे. कारण ती त्या सामाजिक कार्याची गरज असते. आपला देश अधिकाधिक विकसित व्हावा ही तळमळ त्याच्यामध्ये असेल तर ही सामाजिक कार्ये कायद्याच्या सक्तीपेक्षा देशाच्या भक्तीतूनच झाली पाहिजेत. दुर्दैव असे आहे की, आज त्यासाठी कायदा करण्याची वेळ आली आणि इथेच देशभक्तीचा पराभव झाल्यासारखेच चित्र निर्माण झाले. आमचे तर असे स्पष्ट मत आहे की, समाजातली नैतिकता ही कायद्याने नाही तर स्वाभाविक प्रवृत्तीतूनच निर्माण होते. ज्यामधून कुटुंब समाज आणि देश याचे खऱ्या अर्थाने संवर्धन होऊ शकते. कायद्याने कितीही कामे झाली तरी त्यामागे तितकी प्रखर सामाजिक भावना असेलच असे सांगता येत नाही. आजच्या व्यापारी युगाम ध्ये सामाजिक कामाचाही व्यापारी भाषेतच विचार केला जातो. म्हणूनच देशभरामध्ये सरकारी अनुदानावर चालणाऱ्या सामाजिक संस्थांचे पेव फुटले आहेत. अनुदान आणि इन्कमटॅक्समधली वजावट यासाठी सामाजिक कामाचे खर्च दाखवले जातात. आतादेखील कॉर्पोरेट क्षेत्र दोन टक्के रक्कम सामाजिक कामासाठी दाखवून त्यापोटी इन्कम टॅक्समध्ये सवलतच मिळवणार आहे.